**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. चेतन ऊर्फ सोमनाथ राजेंद्र बागल<br>मु.पो. वडापुरी, ता. इंदापूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>बारामती विभाग, बारामती, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. चेतन ऊर्फ सोमनाथ राजेंद्र बागल यांनी त्यांना झालेल्या अपघातासंबंधी एस.टी. चालकाने दिलेल्या चुकीच्या फिर्यादीबाबत व झालेल्या तपासाबाबत फेरचौकशीची मागणी केली होती. ती केव्हा होणार, विलंब का झाला, नाकारण्याचा खुलासा का केला नाही, परिणामास जबाबदार कोण, इत्यादी माहितीची त्यांनी मागणी केली होती. त्यास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती यांनी उत्तर दिले. उत्तर समाधानकारक नसल्याचे अपीलकर्त्याने म्हटले आहे. मात्र त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. अपीलकर्त्याची मागणी ही मुख्यत: चौकशी व फेरचौकशीची असून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नसली, तरी त्यासंबंधी माहिती देणे आवश्यक आहे. तशी माहिती देण्यात आल्याचे कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. गैरहजेरीबाबत त्यांना समज देण्यात येत आहे. गैरहजेरीबाबत त्यांनी आठ दिवसांत लेखी खुलासा आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.** ३१.१०.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २५.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शौकत अब्दुल पठाण<br>वॉर्ड क्र.१, घर क्र.७२-अ, मोरगाव रोड,<br>(कसबा ) बारामती, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | संशोधन अधिकारी, जात पडताळणी पथक,<br>समाजकल्याण जात पडताळणी विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,<br>विभागीय जात पडताळणी समिती, पुणे | प्रतिनिधी<br>हजर |

अपीलकर्ता श्री. शौकत अब्दुल पठाण यांनी सन २००२ ते २००७ या कालावधीत जातीच्या दाखल्याच्या पडताळणीसाठी आलेल्या प्रकरणाबाबत जात पडताळणी विभागाने केलेल्या कारवाईबाबत माहिती व त्याअनुषंगाने प्रामुख्याने जातीच्या दाखल्याची मागणी केली होती. अशा दाखल्याची पूर्तता हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र आपल्याला हवा असलेला जातीचा दाखला प्राप्त झाला असल्याने सदर अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने दि. २७.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

[illegible]

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.माधव श्रीधर दामले
प्लॉट क्र.७८, सर्व्हे क्र.८१, प्रज्ञानंद सोसायटी,
शीतल हॉटेलसमोर, वडगाव मावळ, जि.पुणे-४१२१०६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १०३९+११०४+११०५/ पुणे / २००७ |
| २. | सुनावणीची तारीख | १८.१.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव श्रीधर दामले
प्लॉट क्र.७८, सर्व्हे क्र.८१, प्रज्ञानंद सोसायटी,
शीतल हॉटेलसमोर, वडगाव मावळ, जि.पुणे-४१२१०६

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ, जि.पुणे डॉ.संपत खिलारी

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १०३९ | ४.५.२००७ | १.६.२००७ | ७.६.२००७ | आदेश नाही |
| ११०४ | ७.६.२००७ | ५.७.२००७ | १२.७.२००७ | आदेश नाही |
| ११०५ | ७.६.२००७ | ४.४.२००७ | ५.७.२००७ | आदेश नाही |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सर्व्हे क्र.८१, ८१/२ व २८१/२ब या अकृषिक मंजूर ले-आऊटमधील मोकल्या जागेच्या सातबारा उताऱ्यावर बालवाडी खोली अशी नोंद केलेली आहे. ही नोंद प्रमाणित केल्याच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात व फेरफार पत्रकाची प्रत. नोंद घेण्यासाठी ज्या कागदपत्रांच्या आधारे नोंद घेतली त्या सर्वांच्या प्रती.

## विवेचन

मौजे वडगाव, ता.मावळ, जि.पुणे येथील स.नं.८१, ८१/२, २८१/२ब या अकृषिक मंजूर ले-आऊटमधील मोकळ्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावरुन 'बालवाडी खोली' अशी नोंद प्रमाणित केल्याच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती व फेरफार पत्रकाची प्रत अपीलकर्ता श्री.माधव श्रीधर दामले यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ यांच्याकडे मागितली होती. प्रचलित नियमाची प्रत व केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे मिळण्याची मागणी, तसेच मोकळ्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर प्रज्ञानंद सर्वसाधारण सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थेच्या नावाची नोंद करण्याबाबत दि.४.४.२००७ रोजी तहसीलदार कार्यालयाकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे मिळण्याची मागणी श्री.दामले यांनी अन्य दोन अर्जांद्वारे केली होती. अंगणवाडीच्या नोंदीची प्रचलित नियमाप्रमाणे चौकशीने योग्य ती तात्काळ कार्यवाही करावी, असे या संदर्भात उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे यांनी तहसीलदार, मावळ यांना कळविले. आपल्याला माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्या अपिलाची दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.दामले यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले दाखल केली आहेत.

संबंधित प्रकरणात हितसंबंधितांना नोटिसा काढण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.किशोर घाडगे यांनी श्री.दामले यांना दि.५.७.२००७ रोजी कळविले व प्रचलित नियमाच्या साठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे अवलोकन करावे, असे कळविले. 'माहिती अधिकारी, माहितीच्या मोबदल्यात सल्ला, सूचना किंवा आदेश हे माहिती अधिनियम २००५ च्या कोणत्या तरतुदीनुसार देऊ शकतात याचा लेखी खुलासा अधिनियमाच्या प्रतीसहीत सादर करण्यास सांगावे,' आदी मुद्दे नमूद करुन श्री.दामले

यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ यांच्याकडे अपील केले. संस्थेचे नाव मोकळ्या जागेला लावण्याबाबतचा अर्ज मंडल अधिकारी, वडगाव मावळ यांच्याकडे पाठविल्याचे हक्क नोंदी संकलनाकडील कार्यविवरणावरुन दिसून येते. तसेच बालवाडी खोलीसंबंधाने कोणताही फेरफार पडला नसल्याने कोणताही फेरफार पुरविता येत नाही, असे श्री.घाडगे यांनी कळविले. सदर नोंदीचा फेरफार पडलेला नसल्याने ७/१२ उताऱ्यावर नोंद कशी आली याबाबत आपल्या कार्यालयाकडून काय कार्यवाही करण्यात आली याचा विस्तृत तपशील व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करावीत, अशी मागणी श्री.दामले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ यांच्याकडे अपिलात केली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आवश्यक ती माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी श्री.दामले यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात लेखी व तोंडी केली. आपला अर्ज निकाली कसा काढण्यात आला, त्यासाठी कोणत्या निकषाचा आधार घेण्यात आला; याचे लेखी स्पष्टीकरण, जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊनही निर्णय न देण्याबाबत सबळ पुराव्याच्या कारणासह अर्जदारास का कळविले गेले नाही; याचे योग्य स्पष्टीकरण प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून मागविण्यात यावे, संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या मोकळ्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर सोसायटीचे नाव लावण्यास होत असलेल्या विलंबाबाबतची कारणे सबळ पुराव्याच्या कागदपत्रांसह उपलब्ध करावीत, अशा स्वरुपाच्या मागण्या श्री.दामले यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केल्या आहेत.

आयोगाने अपिलाच्या संदर्भातील सद्यस्थिती कळविण्याबाबत संबंधितांना दि.१७.१२.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रानंतर आपल्याला काही कागदपत्रे पाठविण्यात आली, असे श्री.दामले यांनी नमूद केले आहे. तसेच 'प्लॉटधारक सौ.विद्या पोसे यांनी केलेल्या अर्जावर दिलेली माहिती व आपल्याला दिलेली माहिती यात तफावत आहे. तलाठी महोदयांनी सदर नोंद पीकपहाणीला केल्याबाबत व ती नोंद १५५ अन्वये कमी केल्याबाबत तहसीलदारांना कळविल्याचे दिसून येत असूनही या माहितीची उपलब्धता आपल्यापासून दडविण्याचा यशस्वी प्रयत्न माहिती अधिकारी यांच्या उत्तरातून आढळून येतो. तलाठी यांचा अहवाल नक्कीच

शंकास्पद आहे,' अशा स्वरुपाची विधाने श्री.दामले यांनी आयोगला दि.१४.१.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात केली आहेत.

श्री.दामले यांच्या विनंतीनुसार अपिलांची एकत्रित सुनावणी दि.१८.१.२००८ रोजी घेण्यात आली. आयोगाने अपिलांबाबतचे निवेदन दहा दिवसात करुन त्याची प्रत, तसेच ऊर्वरित कागदपत्रे श्री.दामले याना देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. आपल्याला अशी कागदपत्रे मिळाली नसल्याचे श्री.दामले यांनी दि.२९.१.२००८ रोजी आयोगाला कळविले. श्री.दामले यांनी आपल्याला अद्याप माहिती न मिळाल्याचे दि.२९.१.२००८, दि.१६.२.२००८, दि.१४.३.२००८ अशा पत्रांनुसार आयोगाला कळविले. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार तहसीलदार डॉ.संपत खिलारी यांनी विहित मुदतीत अहवाल सादर केला नाही. त्यांच्या विनंतीनुसार दोनदा मुदतवाढ देऊनही त्यांनी अहवाल सादर न केल्याने कारवाईची सूचना देणारे पत्र आयोगाने पाठविल्यानंतर दि.२१.४.२००८ रोजी डॉ.खिलारी यांनी अहवाल सादर केला. श्री.दामले यांना आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात आली असून सर्व कागदपत्रे अवलोकनार्थही उपलब्ध करुन देण्यात आली. मोकळ्या जागेवर प्रज्ञानंद संस्थेची नोंद करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे, महसूल शाखा यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती त्यांना देण्यात आली, तसेच त्यांचे आदेश प्राप्त होताच कार्यवाही करण्याची दक्षता घेत असल्याचे व या जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करुन अतिक्रमण त्वरित काढण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे डॉ.खिलारी यांनी त्यात नमूद केले आहे. तसेच या पत्राच्या प्रती श्री.दामले यांना पुरविण्यात आल्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'गटविकास अधिकारी, मावळ व ग्रामसेवक, वडगाव यांना बालवाडी ( अंगणवाडी ) तात्काळ अन्य ठिकाणी हलविण्याबाबत कळविण्यात आले असून गटविकास अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त होताच विभागीय आयुक्त यांच्या निर्देशानुसार पुढील कारवाई करण्याची दक्षता घेत आहोत,' असे डॉ.खिलारी यांनी श्री.दामले याना कळविले असल्याचे त्यात नमूद केले आहे. मात्र या माहितीने समाधान झाले नसल्याचे श्री.दामले यांनी तहसीलदार, मावळ यांना कळविले व त्याबाबतच्या सविस्तर निवेदनाची प्रत आयोगाला पाठविली.

आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी कार्यवाही करीत नसल्याची तक्रार श्री.दामले यांनी सातत्याने आयोगाकडे केली. त्याची दखल घेऊन आयोगाने डॉ.खिलारी व श्री.घाडगे यांचा खुलासा मागविला.

तत्कालीन तहसीलदार डॉ.खिलारी यांनी दि.१.७.२००८ रोजी श्री.किशोर घाडगे यांनी दि.११.७.२००८ रोजी आयोगाकडे आपले लेखी व तोंडी म्हणणे सादर केले. वेळोवेळी श्री.दामले यांना माहिती देण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधून, तसेच त्यांना कार्यालयात बोलावून कागदपत्रे अवलोकन करण्यासाठीही दिली होती. परंतु श्री.दामले यांची मुख्य मागणी कार्यवाहीची असून त्याबाबत आपण वेळोवेळी योग्य ती पावले उचललेली आहेत, असे प्रतिपादन श्री.घाडगे व डॉ.खिलारी यांनी केले. त्याप्रमाणे अनुषंगिक कागदपत्रेही त्यांनी सादर केली.

'दि.२५.१.२००८ रोजी झालेल्या चर्चेदरम्यान सदर जमिनीस प्रज्ञानंद सर्वसाधारण सेवा सहकारी संस्था मर्यादित या नोंदणीकृत संस्थेचे नांव लावणे बाबत अपिलार्थी व मी समक्ष चर्चा केलेली आहे. सदर चर्चेदरम्यान सदर संस्थेचे नांव लावणेकामी सदर जमिनीचा विकसक व संबंधित संस्थेचे प्रतिनिधी यांना सुनावणीकामी नोटीस काढणे आवश्यक राहील याबाबत अपिलार्थी यांना समक्ष कल्पना दिली असता अपिलार्थी यांनी त्यास अनुकूलता दर्शविली होती. तथापि, आमचे दरम्यान झालेले चर्चेनुसार कार्यवाही सुरु करणे दरम्यान माझी तहसीलदार या पदावरुन तहसीलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे या पदावर दि.१६ फेब्रुवारी २००८ रोजी बदली झालेली आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयाकडून दि.२९.२.२००८ व १.४.२००८ रोजी तहसील कार्यालय, मावळ येथे पाठविलेल्या पत्राबाबत मला कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही,' असे डॉ.खिलारी यांनी दि.१.७.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे. तसेच 'सदर विषयाकामी मी वरीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे, तथापि दि.१८.१.२००८ चे निर्देशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत आपले कार्यालयास अवगत केलेले नाही हे मला मान्य असून सदर अनियमतेबाबत मी दिलगिरी व्यक्त करीत आहे,' असेही नमूद केले आहे.

शंकास्पद आहे,' अशा स्वरुपाची विधाने श्री.दामले यांनी आयोगला दि.१४.१.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रात केली आहेत.

श्री.दामले यांच्या विनंतीनुसार अपिलांची एकत्रित सुनावणी दि.१८.१.२००८ रोजी घेण्यात आली. आयोगाने अपिलांबाबतचे निवेदन दहा दिवसात करुन त्याची प्रत, तसेच ऊर्वरित कागदपत्रे श्री.दामले याना देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. आपल्याला अशी कागदपत्रे मिळाली नसल्याचे श्री.दामले यांनी दि.२९.१.२००८ रोजी आयोगाला कळविले. श्री.दामले यांनी आपल्याला अद्याप माहिती न मिळाल्याचे दि.२९.१.२००८, दि.१६.२.२००८, दि.१४.३.२००८ अशा पत्रांनुसार आयोगाला कळविले. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार तहसीलदार डॉ.संपत खिलारी यांनी विहित मुदतीत अहवाल सादर केला नाही. त्यांच्या विनंतीनुसार दोनदा मुदतवाढ देऊनही त्यांनी अहवाल सादर न केल्याने कारवाईची सूचना देणारे पत्र आयोगाने पाठविल्यानंतर दि.२१.४.२००८ रोजी डॉ.खिलारी यांनी अहवाल सादर केला. श्री.दामले यांना आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात आली असून सर्व कागदपत्रे अवलोकनार्थही उपलब्ध करुन देण्यात आली. मोकळ्या जागेवर प्रज्ञानंद संस्थेची नोंद करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे, महसूल शाखा यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती त्यांना देण्यात आली, तसेच त्यांचे आदेश प्राप्त होताच कार्यवाही करण्याची दक्षता घेत असल्याचे व या जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करुन अतिक्रमण त्वरित काढण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे डॉ.खिलारी यांनी त्यात नमूद केले आहे. तसेच या पत्राच्या प्रती श्री.दामले यांना पुरविण्यात आल्या असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'गटविकास अधिकारी, मावळ व ग्रामसेवक, वडगाव यांना बालवाडी ( अंगणवाडी ) तात्काळ अन्य ठिकाणी हलविण्याबाबत कळविण्यात आले असून गटविकास अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त होताच विभागीय आयुक्त यांच्या निर्देशानुसार पुढील कारवाई करण्याची दक्षता घेत आहोत,' असे डॉ.खिलारी यांनी श्री.दामले याना कळविले असल्याचे त्यात नमूद केले आहे. मात्र या माहितीने समाधान झाले नसल्याचे श्री.दामले यांनी तहसीलदार, मावळ यांना कळविले व त्याबाबतच्या सविस्तर निवेदनाची प्रत आयोगाला पाठविली.

'मौजे वडगाव येथील उपरोक्त सर्व्हे क्रमांकाच्या मोकळ्या जागेवर सोसायटीचे नाव लावणेबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांना उपलब्ध असलेली सर्व माहिती मुदतीत पुरविलेली आहे. अर्जदार याना मी स्वत: भ्रमणध्वनीवर संपर्क साधून, तसेच त्यांचे विनंतीनुसार वेळ ठरवून संपूर्ण संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिलेली होती. त्यामधील त्यांना आवश्यक ते सर्व कागदपत्र पुरविलेले आहेत,' असे श्री.घाडगे यानी प्रत्येक निवेदनात म्हटले असून दि.११.७.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनातही त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता श्री.दामले यांची मुख्य मागणी मोकळ्या जागेतील बालवाडी हलवून तेथे प्रज्ञानंद संस्थेचे नाव लावण्याच्या कार्यवाहीची आहे. त्या अनुषंगाने श्री.दामले यांनी सातत्याने पत्रव्यवहार केला आहे. मूळ अर्जानुसार आवश्यक अशा कागदपत्रांबरोबरच अपिले व अनुषंगिक पत्रव्यवहार यात श्री.दामले यानी अनेक बाबींच्या खुलाशाची व अतिरिक्त कागदपत्रांची मागणी केली आहे. मूळ अर्जातील मागणीव्यतिरिक्त अतिरिक्त तपशील, तसेच स्पष्टीकरण वा खुलासा अपिलात मागता येणार नाही. तसेच श्री.दामले यांनी केलेली अनेक विधाने माहिती मागण्यापेक्षा जाब विचारण्याच्या स्वरुपाची आहेत, हेही उचित नाही.

श्री.दामले यांना विविध प्रकारची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यानी दिली आहेत, परंतु आपण म्हणतो तशाच स्वरुपात कागदपत्रे व खुलासे आदि मिळाली पाहिजे, असा श्री.दामले यांचा आग्रह त्यांच्या निवेदनातून व पत्रव्यवहारातून दिसतो. अनेक प्रकारच्या तपशिलाची मागणी विविध पत्रव्यवहारान्वये ते करीत असल्याचे दिसते. 'प्रज्ञानंद संस्थेचे नांव मोकळ्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर लावण्याबाबतच्या प्रकरणात तत्कालीन तहसीलदार यांनी माहिती आयुक्तांसमोरील सुनावणीचे वेळी हे प्रकरण शीघ्रतेने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सुनावणीपूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देऊन आपण दिशाभूल तर करीत आहातच व त्यावर आजपर्यंत पाठपुरावा करण्याचे/ केल्याचे कुठलेही प्रयत्न दिसून येत नाहीत,' असे त्यांनी दि.२४ एप्रिल २००८ रोजी अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मावळ यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता याला दुजोरा मिळत

नाही. त्यांच्या निवेदनांमधून या मागणीच्या स्वरुपातील कार्यवाहीचा आग्रह स्पष्ट होतो. अशी कार्यवाही हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

वरील बाबी लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.दामले यांना माहिती देण्याबाबत व मोकळ्या जागेला प्रज्ञानंद संस्थेचे नांव लावण्याच्या त्यांच्या मुख्य मागणीच्या कार्यवाहीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सातत्याने त्यांना अवगत केले आहे. तरीही माहिती-मागणीच्या मूळ अर्जानुसार जी कागदपत्रे मिळालेली नाहीत, असे श्री.दामले यांचे म्हणणे आहे त्या कागदपत्रांची नेमकी यादी त्यांनी कोणत्याही भाष्याविना जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांना सादर करावी. ती यादी सादर केल्यानंतर आठ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ऊर्वरित माहिती देण्याची कार्यवाही पूर्ण करावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) डॉ.खिलारी यांनी आयोगाच्या पत्रानुसार अहवाल सादर करण्याबाबत दिलेले स्पष्टीकरण व दिलगिरी स्वीकारण्यात येत असून यापुढील काळात आदेशाच्या कार्यवाहीचा अहवाल विहित मुदतीत सादर करण्याची त्यांना समज देण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.७.२००८

सोलापूरसांगली-२१-२६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९ / सोलापूर | |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रकाश रघुनाथ काटमोरे<br>मु.पो. पिंपरी (साकत), ता. बार्शी, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचिव, पिंपरी (सा), विविध कार्यकारी सेवा संस्था मर्या., पिंपरी, ता. बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,<br>बार्शी, जि. सोलापूर | हजर |

दि. १.१.२००६ ते ३०.८.२००६ या कालावधीमध्ये संस्थेच्या सर्व कर्जदार सभासदांना पिकनिहाय कसे वाटप. किती रक्कम, कोणत्या सभासदाला कोणत्या पिकाला किती वाटप केले, याची संपूर्ण माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा सचिव, पिंपरी सा, विविध कार्यकारी सेवा संस्था मर्या., यांच्याकडे मागितली होती.

माहितीसाठी रू. १५०/- शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास दोन वेळा कळवूनही शुल्क भरले नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्याने माहितीसाठीची रक्कम भरल्यास माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी म्हटले आहे. माहिती मागून शुल्क न भरण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. त्याबद्दल अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. रू. १५०/- शुल्क भरून अपीलकर्त्याने माहिती प्राप्त करून घ्यावी.

पुणे
दि. ८ .७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. अ. आ. हिरेमठ<br>मु. पो. नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक | हजर |

निवृत्तीनंतरचे फायदे, निवृत्तीसंबंधी नियमावली इत्यादी माहिती अपीलकर्ता डॉ. अ.आ. हिरेमठ यांनी दि. २.११.२००६ रोजीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, वणी-दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक यांच्याकडे मागितली होती. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरूळ यांच्याकडेउपलब्ध असलेली सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे व त्यानुसार अपीलकर्त्याचे समाधान झाले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. डॉ. हिरेमठ यांनी त्यास संमती दर्शविली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.३.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | १२ / कोल्हापूर | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. अरविंद शिवगोंडा कदम<br>मु.पो.उदगाव, ता. शिरोळ,<br>जि. कोल्हापूर-४१६ १३४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिक कार्यालय, पुणे-५ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण<br>संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१ | हजर |

अपीलकर्ता यांनी दि. १३.५.२००६ रोजी समक्ष सादर केलेले लेखी निवेदन, तसेच दि. १७.५.२००७ च्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (ता), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपलब्ध करून दिलेली माहिती विचारात घेता मूळ अर्जाप्रमाणे माहिती मिळाल्यावर अपिलात अपीलकर्त्याने अधिक माहिती मागितली आहे. असे करणे योग्य नाही. मूळ अर्जानुसारच माहितीचा विचार केला जाईल.

अपीलकर्त्यास मूळ अर्जातील मागणीप्रमाणे माहिती मिळाली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ४.७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रामचंद्र भैरू पाटील<br>के. डी.देसाई कॉलनी, गारगोटी,<br>ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे-७ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रबंधक, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-७ | हजर |

अपीलकर्ता श्री. रामचंद्र भैरू पाटील यांनी स्वत: दिलेल्या सेट परीक्षा निकालासंबंधी प्रत्येक पेपरनिहाय त्यांना मिळालेले गुण, तसेच प्रत्येक पेपरमध्ये जास्तीत जास्त व कमीत कमी किती गुणांचा परीक्षार्थी आहे, याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार गुण कळविता येत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(ई) व (जे) नुसार माहिती नाकारली. यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांची माहिती व प्रत अपीलकर्त्यास विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि. ९.७.२००८ रोजी समक्ष देण्यात आली. सदर मार्गदर्शक तत्त्वांमधील अशा अटींमध्ये सुधारणा / दुरूस्ती व्हावी, अशी अपीलकर्त्याने मागणी केली होती. या संदर्भात पुणे विद्यापीठामार्फत पत्रव्यवहार सुरू असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले.

उपलब्ध कागदपत्रे व संबंधितांची निवेदने पाहता गुणांसंबंधी माहिती दिल्यास यु.जी.सी. मार्गदर्शक तत्त्वांचा भंग होत आहे, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे. मात्र स्वत:च्या गुणांचीही माहिती विद्यार्थ्याला न मिळणे योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी यु.जी.सी. कडे पत्रव्यवहार करून मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदलाबाबत पाठपुरावा करावा. तसेच या विषयाची कार्यवाही निर्णायकरीत्या पुर्ण होताच त्याची माहिती सर्व विद्यार्थ्यांसाठी जाहीर करावी.

पुणे
दि. 31 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक अंतुराम कोळी — अपीलकर्ता
मु.पो.पाटण, ता.पाटण, जि.सातारा

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, कराड
ता. कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.७.२००६ |

**३. उपस्थित**

अपीलकर्ता श्री. दिपक अंतुराम कोळी
मु.पो.पाटण, ता.पाटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.वसंतराव देशमाने

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, कराड
ता. कराड, जि. सातारा डॉ.स्वाती देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>अनुसूचित जमातीचे (महादेव कोळी) दाखले मिळण्याबाबत | |

## विवेचन

महादेव कोळी या अनुसूचित जातीचे दाखले मिळण्याच्या संदर्भात श्री.दिपक अंतुराम कोळी व महादेव कोळी संघटना, शाखा पाटण यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग, कराड, जि. सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे श्री.कोळी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केलेले अपील विहित मुदतीत नसल्याच्या कारणावरुन व जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती दिली असल्याचे नमूद करुन फेटाळले. त्याविरुध्द श्री.कोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

महादेव कोळी म्हणून अनुसूचीत जातीजमातीचे दाखले मिळण्यासंबंधाने श्री.कोळी व पाटण तालुक्यातील महादेव कोळी संघटना गेली काही वर्षे मागणी करीत आले आहेत. असे दाखल न मिळाल्यामुळे नोकरी, शैक्षणिक सवलत इत्यादीपासून वंचित झाल्याने झालेल्या नुकसानीला जबाबदार कोण, याची शासकीय परिपत्रकाद्वारे माहिती मिळावी, अशी मागणी त्यांनी केली होती. ही मागणी संदिग्ध असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना महादेव कोळी जातीचे दाखले देण्याच्या कार्यपध्दतीची माहिती कळविली. सातारा जिल्ह्यातील कोळी हे महादेव कोळी नसून मुख्यतः 'पाणभरे' कोळी या जमातीशी संबंधित असल्याचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन १९८२ साली नमूद केले आहे. म्हणून महादेव कोळी असल्याचे दाखले देता येणार नाहीत व त्यामुळेच या जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेली प्रकरणे प्रलंबित नसल्याचे उत्तर तहसीलदार कार्यालयाने व प्रांत

अधिकारी कार्यालयाने दिले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महादेव कोळी जमातीची नोंद, क्षेत्रबंधन-स्थलांतराचा व महादेव कोळी असल्याचा सन १९५० पूर्वीचा पुरावा आदि बाबी संबंधित दाखल्यासाठी आवश्यक असल्याचे व श्री.कोळी यांच्यासह नऊ व्यक्तींनी अशा कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी श्री.वसंतराव देशमाने यांनी नमूद केले. प्रमाणपंत्र मागणी केलेल्या व्यक्ती पाणभरे कोळी नसून महादेव कोळी आहेत, त्याबाबतचे आपल्यासह नऊ व्यक्तींचे सर्व पुरावे आपण आठ दिवसात सादर करु, असे प्रतिपादन श्री.कोळी यांनी केले. अशा प्रकारची कागदपत्रे सादर केल्यास जात प्रमाणपत्राच्या विहित पध्दतीनुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे अपिलीय प्राधिकारी श्री.वसंतराव देशमाने व जन माहिती अधिकारी डॉ.स्मिता देशमुख यांनी सांगितले. अशी कागदपत्रे सादर करण्याचा व त्यानुसार माहितीची पूर्तता करण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. दि.१३.२.२००८ रोजी अशी कागदपत्रे सादर करण्यासाठी आपण गेलो होतो, परंतु उपविभागीय अधिकारी, कराड, उपविभाग, कराड यांनी या कागदपत्राची पाहणी न करता तहसीलदारांकडे नव्याने प्रतिज्ञापत्र करण्यास सांगितले, असे सातारा महादेव कोळी सह्याद्री आदिवासी विकास मंडळाचे अध्यक्ष श्री.संभाजी दत्तात्रय कोळी यांनी आयोगाला कळविले. जातीच्या प्रमाणत्राच्या संदर्भात अपीलकर्त्याने विहित कार्यपध्दतीनुसारच कार्यवाही केली पाहिजे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी यांनी संबंधितांना मार्गदर्शन करणे योग्य ठरेल.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२५.७.२००८
२१.१.२००८सातारा१६-१८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. गुलाब ज्ञानोबा बाबर<br>मु. पो. आलेगाव, ता. सांगोला, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापक, निजामपूर हायस्कूल, निजामपूर<br>ता. सांगोला, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. गुलाब ज्ञानोबा बाबर यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेची खरी नक्कल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निजामपूर हायस्कूल, निजामपूर यांच्याकडे मागितली होती. सदर माहिती आपणास यापूर्वीच मिळाली असल्यामुळे तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. १३.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. तसे निवेदन त्यांनी संबंधित पत्रासह सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .७.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक बळवंत ठोकळे
रा.सासपडे, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
सासपडे, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक बळवंत ठोकळे
रा.सासपडे, ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
सासपडे, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.१९९६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१०.१९९६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लक्ष्मीनगर, सासपडे, ता.जि.सातारा खोल्या बांधकामासंबंधी, शाळेच्या पाठीमागील बाजूस बांधण्यात आलेले सांस्कृतिक भवन, दत्त मंदिर, व्यायाम शाळा, गणपती नवीन स्टेज इ.चे बांधकाम, मंजुरी आदेश, बांधकाम प्लॅन, ग्रामपंचायत ठराव, जागेचा उतारा, जिल्हाधिकारी यांचे परवानगी आदेश, जागेची कब्जेपट्टी. | |

## विवेचन

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या खोल्या, व्यायामशाळा, दत्तमंदिर, गणपती स्टेज आदि बांधकामाबाबत जागेचे उतारे व ग्रामपंचायतीचे ठराव यासह माहिती अपीलकर्ता श्री.विनायक बळवंत ठोकळे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सासपडे, ता.जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. सन १९९३ ते २००६ या काळातील ही माहिती असून माहिती आढळ होत नसल्याने व ती विस्तृत असल्याने शोध घेण्यासाठी आणखी एका महिन्याची मुदत मागणारा विनंतीअर्ज ग्रामसेवकांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांच्याकडे केला. त्याविरुध्द श्री.ठोकळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांच्याकडे अपील केले. त्यांनी दि.७.११.२००६, २७.११.२००६ व ४.१२.२००६ अशी तीन वेळा सुनावणी घेतली. उपलब्ध माहिती दाखवून त्यांना माहितीसाठी अभिलेखाचे अवलोकन करण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. परंतु वाढीव मुदत मागणीची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसून आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही, तसेच जिल्हा

परिषदेच्या बांधकाम व शिक्षण विभाग यांच्याकडून अन्य माहिती घ्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी यांनी दिला, असे नमूद करुन श्री.ठोकळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

वाढीव गावठाणातील भूखंडाबद्दलचा हा विषय आहे. जिल्हापरिषदेची शाळा त्यासाठी आरक्षित असलेल्या जागेवर नसून विनापरवाना बांधलेली आहे, असे श्री.ठोकळे यांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायत व श्री.ठोकळे यांच्यामध्ये वाद असून त्या अनुषंगाने ही माहिती ते मागवीत आहेत, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

जिल्हापरिषद शाळेच्या खोल्या, व्यायमशाळा आदि कोणतेही बांधकाम ग्रामपंचायतीमार्फत झालेले नाही तर जिल्हा परिषदेकडून व खासदार निधी इ. मधून झालेले आहे. व्यायाम शाळा, गणपती स्टेज इ. संबंधातील, तसेच ग्रामपंचायत ठरावांबाबतची पंचायतीच्या दप्तरी उपलब्ध असलेली माहिती श्री.ठोकळे यांना दिली व ऊर्वरित माहिती जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग व शिक्षण विभाग यांच्याकडून घेण्यास सांगितले, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सासपडे श्री.नवनाथ बापू देशमुख व अपिलीय प्राधिकारी श्री.विश्वास शिवराम सिद यांनी नमूद केले. या बांधकामाबाबत जबाबदारी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाची असल्याचे प्रतिपादन श्री.सिद यांनी केले. परंतु बांधकाम मंजुरीसाठी जागेचा दाखला ग्रामपंचायतीने द्यावयाचा असतो, शाळेच्या बांधकामाचा म्हणून जो आपल्याला ठराव दिला तो प्रत्यक्षात शाळेच्या मंजुरीविषयक आहे, अशा प्रकारे अन्य ठरावांबाबतही आपल्याला चुकीची माहिती देण्यात आली आहे. तसेच कब्जेपट्टीची प्रत आपल्याला देण्यात आलेली नाही, असे प्रतिपादन श्री.ठोकळे यांनी केले. प्रत्यक्षात शाळेच्या बांधकामासाठी कोणीही परवानगी मागितलेली नाही व कोणीही परवानगी दिलेली नाही. शाळा अतिक्रमणात आहे, हे ग्रामसेवक श्री.देशमुख यांनी मान्य केले. मात्र जागेची एकूण उपलब्धता व विद्यार्थ्यांची सोय याचा विचार करुन संबंधित जागेवर शाळेच्या खोल्या बांधल्याचे श्री.देशमुख व श्री.सिद यांनी नमूद केले. शाळा अतिक्रमणात आहे, व परवानगी मागितलेली नाही हे लक्षात घेता ती माहिती ग्रामपंचायतीच्या दप्तरी असण्याची शक्यता नाही, ही वसतुस्थिती स्पष्ट न करता माहिती दप्तरी आढळत नसल्याचे व शोधण्याचे काम चालू असल्याचे

उत्तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.देशमुख यांनी देणे योग्य नव्हते. मात्र दप्तरी उपलब्ध असलेली ठरावांच्या प्रतींसह सर्व माहिती त्यांनी श्री.ठोकळे यांना दिली.

श्री.ठोकळे यांनी मागितलेल्या माहितीबाबत वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीच्या संदर्भात नमूद करणे आवश्यक होते. तसेच जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग व शिक्षण विभाग यांच्याकडून घ्यावयाच्या माहितीबाबत श्री.ठोकळे यांना सांगण्याऐवजी संबंधित अर्ज या विभागाकडून जन माहिती अधिकाऱ्यांनी पाठविणे आवश्यक होते, तसे त्यांनी केलेले नाही. ऊर्वरित माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्राप्त करुन ती अपीलकर्त्यास दि.२०.२.२००८ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. ग्रामसेवक श्री.देशमुख यांनी दि.५.३.२००८ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी सातारा यांना त्याबाबत कळविले, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सातारा यांच्या वतीने दि.२८.३.२००८ रोजी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (उत्तर), जिल्हा परिषद, सातारा यांना माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र आपल्याला माहिती मिळाली नसल्याचे श्री.ठोकळे यांनी दि.४.४.२००८ च्या (प्राप्त दि.८.४.२००८) पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

विस्तारीत गावठाणामधील ज्या लक्ष्मीनगर या भागाबाबतची माहिती श्री.ठोकळे यांनी मागितली आहे तेथे भटक्या जाती जमातीतील मागासवर्गीय ७०० लोक राहात आहेत. चार भूखंडांमध्ये ग्रामपंचायतीने समाजमंदिर, सांस्कृतिक भवन, दत्त मंदिर, पाण्याची टाकी इ. सार्वजनिक इमारती बांधल्या आहेत. श्री.ठोकळे यांचा भूखंड शाळेच्या इमारतीच्या समोर असून हा भूखंड शाळेच्या क्रीडांगणासाठी मिळावा व त्यांना अन्य भूखंड द्यावा, अशी मागणी ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केली आहे. त्याचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे. श्री.ठोकळे मूळ गावात राहतात व शाळेसमोरील भूखंडामध्ये त्यांची पत्र्याची शेड आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.विश्वास शिवराम सिद यांनी दि.१७.३.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

हे निवेदन स्वयंस्पष्ट आहे. त्यामुळे प्रश्न उरतो तो जिल्हाधिकारी, सातारा यांनी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (उत्तर), जिल्हा परिषद, सातारा यांना दिलेल्या सूचनेनुसार माहिती दिली जाण्याचा. ती नियोजित मुदतीत व निःशुल्क दिली जाणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोगा पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडील माहिती देण्याबाबत झालेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी, सातारा यांनी विलंबाबाबतच्या संबंधितांच्या खुलाशासह हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.७.२००८**
२१.१.२००८/सातारा/९-१३